# जननी सुरक्षा योजना

## ऐतिहासिक पार्श्वभूमी

शासन परिपत्रक क्रमांक जेएसवाय/२००६/प्र.क्र.१७५/ कु.क.३ दि. २२ डिसेंबर २००६ नुसार जननी सुरक्षा योजना राबविली जाते. या योजनेमध्ये ग्रामीण व शहरी भागातील अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व दारिद्रयरेषेखालील लाभार्थ्यांना लाभ दिला जातो. केंद्रशासनाच्या परिपत्रकानुसार दिनांक ८ मे २०१३ पासून लाभार्थ्यांचे वय व अपत्यासंबंधीच्या अटी शिथिल करण्यात आलेल्या आहेत.

## उद्दिष्टे

राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील, अनुसूचित जाती व अनुसुचित जमातीच्या कुटुंबातील माता मृत्यु व अर्भक मृत्युचे प्रमाण कमी करणे आणि या महिलांचे आरोग्य संस्थेत प्रसुतीचे प्रमाणात वाढ करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

## अंमलबजावणी पध्दत

- राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील व अनुसुचित जाती व जमाती या कुटुंबातील सर्व गरोदर

महिलांना शासकीय व खाजगी मानंकित आरोग्य संस्थेतील कोणत्याही बाळंतपणानंतर लाभ देय आहे तर फक्त दारिद्रयरेषेखालील गरोदर महिलेला घरी बाळंतपणानंतर लाभ देय आहे.

- लाभार्थीकडून जननी सुरक्षा योजनेकरिता आवश्यक असलेली कागदपत्रे प्राप्त करुन घेणे.
- विहीत नमुन्यातील जेएसवाय कार्ड सर्व आवश्यक माहिती भरुन लाभार्थीस देणे.
- पात्र लाभार्थीस प्रसुतीपूर्व तीन तपासणी, धनुर्वात प्रतिबंधक लसीकरण व लोहयुक्त गोळया मिळवून देणे अथवा त्या करिता मदत करणे.
- पात्र जेएसवाय लाभार्थीस शासकीय आरोग्य संस्थ◌ेत किंवा शासन मानांकित खाजगी आरोग्य संस्थेत प्रसुती करिता प्रवृत्त करणे.
- पात्र जेएसवाय लाभार्थीस बॅंकेत खाते उघडून घेण्यासाठी मदत करणे

## लाभार्थ्यास दिले जाणारे लाभ

- ग्रामीण भागातील जेएसवाय पात्र लाभार्थी जर शासकीय आरोग्य संस्था / मानांकित खाजगी आरोग्य संस्थ◌ेत प्रसुत झाली तर तिला प्रसुतीच्या तारखेनंतर ७ दिवसाच्या आत रुपये ७००/- लाभ बॅंक खात्यामध्ये परस्पर जमा होणा-या

धनादेशाव्दारे (Account Payee Crossed Cheque) दिला जातो.

- शहरी भागातील जेएसवाय पात्र लाभार्थी जर शासकीय आरोग्य संस्था / मानांकित खाजगीआरोग्य संस्थेत प्रसुत झाली तर तिला प्रसुतीच्या तारखेनंतर ७ दिवसाच्या आत रुपये ६००/-लाभ बॅंक खात्यामध्ये परस्पर जमा होणा-या धनादेशाव्दारे (Account Payee Crossed Cheque) दिला जातो.
- ग्रामीण व शहरी भागातील फक्त दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील लाभार्थ्यांची प्रसुती घरी झाल्यास अशा लाभारथ् यांस रुपये ५००/- लाभ प्रसुतीच्या तारखेनंतर ७ दिवसाच्या आत बॅंक खात्यामध्ये परस्पर जमा होणाया धनादेशाव्दारे (Account Payee Crossed Cheque) दिला जातो.
- जेएसवाय पात्र लाभार्थीची सिझेरियन शस्त्रक्रिया करणे आवश्यक असल्यास लाभार्थीस रुपये १५००/- लाभ बॅंक खात यामध्ये परस्पर जमा होणाया धनादेशाव्दारे (Account Payee Crossed Cheque) दिला जातो.
-

**आशा कार्यकर्तीस मिळणारे लाभ**

- ग्रामीण भागातील पात्र जेएसवाय लाभार्थीची प्रसुती शासकीय अथवा खाजगी मानंकित आरोग्य संस्थेत करण यासाठी लाभार्थीस प्रवृत्त केल्यास एकूण रुपये ६००/- प्रती लाभार्थी आशा कार्यकर्तीस मानधन म्हणून अदा करण्यात

येते. त्यामधील रुपये ३००/- प्रसूती पूर्व दयावयाच्या सेवा दिल्याची खात्री केल्यावर आणि रुपये ३००/- आरोग्य संस्थ्ेात प्रसुतीसाठी प्रवृत्त केल्याचे स्पष्ट झाल्यानंतर देण्यात येते.

- शहरी भागात पात्र जेएसवाय लाभार्थीची प्रसुती आरोग्य संस्थेत करण्यासाठी लाभार्थीस प्रवृत्त केल्यास एकूण रुपये ४००/- प्रती लाभार्थी आशा कार्यकर्तीस मानधन म्हणून अदा करण्यात येते. त्यामधील रुपये २००/- प्रसूती पूर्व दयावयाच्या सेवा दिल्याची खात्री केल्यावर आणि रुपये २००/- आरोग्य संस्थ्ेात प्रसुतीसाठी प्रवृत्त केल्याचे स्पष्ट झाल्यानंतर देण्यात येते.

## सेवा देणाऱ्या आरोग्य संस्था

ग्रामीण भागात – उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, जिल्हा स्त्री रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, आणि जननी सुरक्षा योजनेकरिता मानांकित केलेली खाजगी रुग्णालये.

शहरी भागात – वैदयकीय महाविदयालये, नगरपालिका व महानगरपालिका यांच्या कार्यक्षेत्रातील नागरी आरोग्य केंद्रे, नागरी कुटुंब कल्याण केंद्रे व त्यांच्याकडील इतर रुग्णालये आणि शासन अनुदानित रुग्णालये.

## बिगर शासकिय संस्थांचे कार्य

खाजगी रुग्णालये सुध्दा जननी सुरक्षा योजनेच्या अंतर्गत जसुयो

पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी मानांकित करण्यात आलेले आहेत.